THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 26TH NOVEMBER 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**ज्या कित्येक इमारती व जमिनी सरकारची मिळकत असून किंवा सरकारच्या भोगवट्यांत असून म्युनिसिपालिटींच्या हद्दींच्या आंत असतील त्यांना म्युनिसिपल कायदे लागू होण्याची माफी करण्यासाठीं ठराव करण्याबाबद आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थी, ज्या कित्येक इमारती व जमिनी सरकारची मिळकत असून किंवा सरकारच्या भोगवट्यांत असून म्युनिसिपालिटींच्या हद्दींच्या आंत असतील त्यांना म्युनिसिपल कायदे लागू होण्याची माफी करण्यासाठीं ठराव करणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

१. (१) या आक्टास सन १८९६ चा सरकारी इमारतींबाबद आक्ट असें ह्मणावें. सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. या आक्टांत, "म्युनिसिपल कमिटी" या संज्ञेंत, त्या त्या काळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या किंवा आक्टाच्या ठरावांवरून किंवा त्या ठरावांअन्वयें रचलेल्या म्युनिसिपल कार्पोरेशनाचा किंवा म्युनिसिपल कमिशनरांच्या मंडळीचा समावेश होतो; आणि "सरकार" या शब्दांत स्थानिक सरकारचा व तसाच हिंदुस्थान सरकारचा समावेश होतो. व्याख्या.

३. (१) कोणत्याहि म्युनिसिपालिटीच्या हद्दींच्या आंत इमारती उभारण्याच्या, पुनः उभारण्याच्या, बांधण्याच्या, त्यांमध्यें फेरफार करण्याच्या किंवा त्या चांगल्या स्थितींत राखण्याच्या कामाचें नियमन करण्याबाबत त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या कोणत्याहि कायद्यांतील किंवा आक्टांतील कोणताहि ठराव, जी कोणतीहि इमारत सरकारची मिळकत असेल किंवा सरकारच्या भोगवट्यांत असेल, अथवा जी सरकारची मिळकत ह्मणून असणाऱ्या किंवा सरकारच्या भोगवट्यांत असणाऱ्या जमिनीवर उभारावयाची असेल, त्या इमारतीस लागू होणार नाहीं असें समजावें. म्युनिसिपालिट्यांच्या आत इमारती उभारणें, वगैरे, कामाचें नियमन करण्याबाबतच्या म्युनिसिपल कायद्यांची सरकारी इमारतींना माफी असण्याबाबद.

(२) वर सांगितल्या प्रकारची कोणतीहि इमारत उभारण्याचें, पुनः उभारण्याचें किंवा तींत फेरफार करण्याचें योजिलें असेल तेव्हां, सदर्हूप्रमाणें उभारण्याच्या, पुनः

उभारण्याच्या किंवा फेरफार करण्याच्या कामास सुरुवात करण्यापूर्वी, म्युनिसिपल कमिटीस त्या योजलेल्या कामाची वाजवी नोटीस दिली पाहिजे.

म्युनिसिपालिट्यांच्या आंत सरकारी इमारती उभारणें वगैरेच्या कामावर निर्बंध ठेवण्याबद्दल.

४. (१) सदरील शेवटच्या कलमांत सांगितल्या प्रकारच्या कोणत्याहि इमारतीच्या बाबतींत, अशा म्युनिसिपालिटीच्या म्युनिसिपल कमिटीस, किंवा याबाबत तिनें अधिकार दिलेल्या कोणत्याहि मनुष्यास, स्थानिक सरकारची परवानगी घेतल्यावांचून नव्हे तर ती परवानगी पूर्वी घेऊन, आणि स्थानिक सरकार साधारण किंवा विशेष हुकुम करून ज्या कोणत्याहि अटी किंवा शर्ती ठरवील त्या अटींना किंवा शर्तींना पात्र राहून, सदर्हू जमीन आणि इमारत व, प्रसंगाप्रमाणें, ती इमारत उभारण्याच्या, पुनः उभारण्याच्या, बांधण्याच्या, तींत फेरफार करण्याच्या किंवा ती चांगल्या स्थितींत राखण्याच्या संबंधाचे सर्व नकाशे, तपासून पाहण्याचा, आणि अशा उभारण्याच्या, पुनः उभारण्याच्या, बांधण्याच्या, फेरफार करण्याच्या किंवा चांगल्या स्थितींत राखण्याच्या कामाच्या संबंधानें ज्या कोणत्याहि हरकती घेणें किंवा सूचना करणें अशा म्युनिसिपल कमिटीस योग्य वाटेल त्या हरकती किंवा सूचना स्थानिक सरकारास लेखी सादर करण्याचा, अधिकार आहे.

(२) वर सांगितल्याप्रमाणें सादर केलेल्या प्रत्येक हरकतीचा किंवा सूचनेचा स्थानिक सरकारानें विचार करून, आपणास कोणताही तपास करणें योग्य वाटल्यास तो केल्यानंतर, त्यावर हुकुम दिले पाहिजेत, आणि अशा हुकुमांस अनुसरून, त्यांत सांगितलेली इमारत प्रसंगाप्रमाणें उभारली पाहिजे, पुनः उभारली पाहिजे, बांधली पाहिजे, तींत फेरफार केला पाहिजे, किंवा ती चांगल्या स्थितींत ठेवली पाहिजे :

मात्र इतकेंच कीं, जर स्थानिक सरकार सदर्हू प्रकारची कोणतीहि हरकत किंवा सूचना नामंजूर करील किंवा तिजकडे दुर्लक्ष्य करील, तर त्या सरकारानें तसें करण्याचीं आपलीं कारणें लेखी दिलीं पाहिजेत.

(३) या कलमाअन्वयें स्थानिक सरकारानें दिलेला प्रत्येक हुकुम गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांजकडून तपासला जाण्यास पात्र आहे, मात्र इतर कोणाकडून तपासला जाण्यास पात्र नाहीं, असें समजावें, आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं त्यावर दिलेला निकाल अखेरचा असला पाहिजे.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

म्युनिसिपालिट्यांतील इमारतींचें नियमन करण्याच्या संबंधानें अमलांत असलेल्या निरनिराळ्या आक्टांचे ठराव मुख्यत्वेंकरून, एन्जिनीयरिंगसंबंधी व आरोग्यरक्षणासंबंधी गरजांकडे योग्य लक्ष्य पुरवून, इमारती बांधण्याच्या व इमारती चांगल्या स्थितींत राखण्याच्या कामावर निर्बंध ठेवण्याची जी जरूरी असते त्या जरूरीप्रमाणें केलेले आहेत, आणि ह्मणूनच म्युनिसिपल कमिट्यांना निरनिराळ्या म्युनिसिपल आक्टांत जे अधिकार दिलेले आहेत ते फार मोठे व थोडे बहुत स्वतंत्र आहेत. निरनिराळ्या प्रसंगीं हिंदुस्थान सरकारच्या नजरेस असें आणण्यांत आलें आहे कीं, खात्यासंबंधी नियमांच्या योगानें, आणि सार्वजनिक बांधकामें योग्य रीतीनें करण्यासाठीं व त्यांवर योग्य देखरेख ठेवण्यासाठीं सरकारानें जीं कुशल माणसें ठेवलेलीं आहेत त्यांच्या सल्लयानें, सदर्हू गरजा पुऱ्या होत असल्यामुळें सरकारी इमारतींच्या बाबतींत वर सांगितल्या प्रकारची जरूरी रहात नाहीं. शिवाय, बादशाही बचावाच्या कामांच्या संबंधानें म्हटलें ह्मणजे हें उघड आहे कीं प्रत्यक्ष निर्बंध ठेवण्याचें काम म्युनिसिपल कमिट्यांनीं चांगल्या रीतीनें करावयाचें असेल तर, तपासून पाहण्याचा जो त्यांना अधिकार आहे त्यावरून, अगदी गुप्त प्रकारचे असण्याचा संभव असलेले नकाशे व कागदपत्र मागून घेऊन पाहण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झालाच पाहिजे; व सदर्हू बाबतींत गुप्तपणा ठेवणें ही जी गोष्ट, कांहीं उघड कारणांमुळें, महत्वाची असते त्या गोष्टीस, सदर्हूप्रमाणें पाहणें ही गोष्ट विरुद्ध आहे. जेथील कायद्यावरून, समुद्रकिनाऱ्यावरील आपल्या ब्याटऱ्यांची, दारूखान्यांची किंवा तोफखान्यांची सुधारणा करण्यासाठींच्या आपल्या डिझैन्स, म्युनिसिपल अधिकाऱ्यांकडे सादर करणें अवश्य असतें, व त्या डिझैन्समध्यें दुसऱ्यांना कदाचित् मनास मानेल तशी ढवळाढवळ करण्याची मोकळीक मिळते, अशा म्युनिसिपल क्षेत्राच्या आंत त्या डिझैन्सप्रमाणें काम करावयाचें

एवढ्याच केवळ कारणामुळें त्या आपल्या डिझैन्सना व्यवहारिक रीत्या सार्वजनिक मत्ता होऊं देण्याची सरकार परवानगी देऊं शकत नाहीं ही गोष्ट साधारणतः कबूल करण्यांत येईल.

२. यास्तव ज्या इमारती म्युनिसिपालिट्यांच्या आंत असून, सरकारच्या मालकीच्या किंवा भोगवट्यांतील जमिनीवर असतील किंवा उभारावयाच्या असतील त्या सर्व इमारतींस सदहू नियम लागू होण्याची माफी करावी असा या मसुद्याचा हेतु आहे. तथापि म्युनिसिपालिट्यांच्या आंतील व्यवस्थांकडे व साधारण कारभाराकडे दुर्लक्ष्य करण्याची हिंदुस्थान सरकारची इच्छा नाहीं. उलट, आपल्या प्रोजेक्ट्स (योजना), संबंध असलेल्या कोणत्याही म्युनिसिपल मंडळीच्या साधारण प्लानांचा पूर्ण विचार करून तयार करणें हें राज्यकारभार चालविणाऱ्या मंडळीचें अवश्य कर्तव्य आहे असें हिंदुस्थान सरकारास वाटतें; आणि अशा प्रोजेक्ट्सच्या गुणदोषांचा विचार करण्याची म्युनिसिपल मंडळ्यांना संधि मिळावी ही गोष्ट वाजवी व रास्त आहे असें त्या सरकारास वाटतें; मात्र, हरकती व सूचना यांच्या संबंधानें अखेरचा निकाल करण्याचा अधिकार, सदहू प्रोजेक्ट्स हातीं घेणाऱ्या स्थानिक सरकारच्या निर्बंधाखालील म्युनिसिपल बोर्डाकडे न राहतां त्या स्थानिक सरकाराकडेसच राहिला पाहिजे. यास्तव, या मसुद्यांत असें ठरविण्याचें योजिलें आहे कीं जें कोणतेंहि काम हातीं घेण्याचा सरकारचा इरादा असेल त्या कामाची वाजवी नोटीस संबंध असलेल्या म्युनिसिपालिटीस दिली पाहिजे; म्युनिसिपल कमिटीला जमीन व नकाशे पाहण्याची परवानगी; योग्य सावधगिरी घेऊन, दिली पाहिजे; त्या संबंधानें त्या म्युनिसिपल कमिटीस जी कोणतीहि हकीकत कळविणें योग्य वाटेल ती हकीकत स्थानिक सरकारानें घेऊन तिचा विचार केला पाहिजे; अशा हकीकतीवर जे हुकुम स्थानिक सरकार देईल त्या हुकुमांस पूर्णपणें अनुसरून सदहू काम केलें पाहिजे; आणि सदहूप्रमाणें दिलेला प्रत्येक हुकुम, शेवटचा उपाय ह्मटला ह्मणजे, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांजकडून तपासला जाण्यास पात्र असला पाहिजे.

तारीख १० माहे आक्टोबर, सन १८९६. (सही) जे. वुडबर्न.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.